# श्रीवर्धन गोखले कॉलेजात ग्रंथालय दिन उत्साहात

बोर्लीपंचतन, १३ ऑगस्ट (वार्ताहर):- श्रीवर्धन येथील गोखले एज्युकेशन सोसायटी संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती आणि ग्रंथालय दिनाचे औचित्य साधून ग्रंथ प्रदर्शन आयोजन आणि ग्रंथ पूजन करण्यात आले.

श्रीवर्धन सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष मनोज गोगटे व उपाध्यक्ष विनय वैद्य यांच्याहस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. वाचन ही आजची काळाची गरज आहे. 'वाचाल तर वाचाल', 'ग्रंथालय हे ज्ञानाचे प्रवेशद्वार आहे ही गोखले महाविद्यालयाची समृद्ध परंपरा आहे, असे विचार वाचनालयाचे अध्यक्ष मनोज गोगटे यांनी व्यक्त केले. आज सर्व दूर विभागामध्ये वाचनाचे प्रमाण अत्यंत कमी होत आहे. प्रसारमाध्यमांचा प्रचंड अतिक्रमणामुळे विद्यार्थी भरकटतात की काय, अशी खंत विनय वैद्य यांनी व्यक्त केली. तसेच गतिमान स्पर्धेसाठी व जीवनात सन्मानाने उभे राहायचे असेल तर वाचनाशिवाय पर्याय नाही, असे विचार प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात असलेल्या साहित्यिकांचे साहित्य, कादंबरी व स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांचे जास्तीत जास्त वाचन करावे तसेच विद्यार्थ्यांनी आपला अधिकाधिक वेळ ग्रंथालयात घालवावा, अशी भावना ग्रंथपाल प्रा. सागर कुंभार यांनी व्यक्त केली.

Scanned with OKEN Scanner